**<u>ठळक बातम्या</u>**

- जीएसटी करसुधारणांचं विविध मान्यवरांकडून स्वागत/ उद्योग जगताने व्यक्त केला आनंद
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांच्याबरोबर शिष्टमंडळ स्तरावर चर्चा
- कोळशाच्या व्यवहारासाठी शेअर बाजाराच्या धर्तीवर वेगळा मंच सुरू होणार

**आणि**

- आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या सुपर फोर सामन्यात भारतानं कोरियाला २-२ असं बरोबरीत रोखलं

**<><><><>**

जीएसटी कररचनेतल्या सुधारणांचं सर्व क्षेत्रातून स्वागत होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या सुधारणांचं कौतुक केलं आहे. जीएसटीचे दर कमी करण्याच्या सरकारच्या या निर्णयामुळे सर्वांना फायदेशीर होणार आहे. जीवनमान सुलभ करण्यासाठी दरांचं सुसूत्रीकरण आणि सुधारणांसाठी एक सविस्तर प्रस्तावही तयार केल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

**परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर** यांनी जीएसटीमधला बदल जीवन सुलभ आणि व्यवसाय सुलभ करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांवर मोठा प्रभाव टाकेल. अशी प्रतिक्रिया आपल्या समाज माध्यमावर दिली आहे. तर जीएसटीमधली सुधारणा ही एक परिवर्तनकारी पाऊल असून शेतकरी, एमएसएमई, महिला, तरुण, मध्यमवर्गीय या सर्वांनाच दिलासादायक असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री **नितीन गडकरी** यांनी दिली आहे.

जीएसटी सुधारणांमध्ये कर्करोग आणि दुर्मीळ आजारांच्या उपचारांसह ३६ जीवनरक्षक औषधांवरचा जीएसटी शून्य टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचा आरोग्यसेवेवरचा खर्च कमी होईल आणि जीवनमान सुधारेल, अशी प्रतिक्रिया केंद्रीय आरोग्य मंत्री **जे. पी. नड्डा** यांनी दिली आहे. जीएसटी कररचनेतल्या

सुधारणेमुळे देशातल्या प्रत्येक कुटुंबाला मदत होणार असल्याची प्रतिक्रिया माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली....

- **- -होल्ड- बाईट- वैष्णव**. - - -

- **<><><><>**

उद्योग आणि व्यवसाय जगताने या सुधारणांचं स्वागत केलं आहे. जीएसटी सुधारणेतल्या कर्जाची परतफेड आणि एमएसएमईवरचे अनुक्रमे ५ टक्के आणि १८ टक्के करांमुळे व्यवसाय प्रक्रिया सुलभ होईल, अशी प्रतिक्रिया भारतीय उद्योग महासंघ सीआयआयने दिली आहे. तर जीएसटी सुधारणा अप्रत्यक्ष कर व्यवस्थेच्या परिपक्वतेला प्रतिबिंबित करतात अशी प्रतिक्रिया फिक्की अर्थात फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने दिली आहे. असोचेम चे मनीष सिंगल यांनी सांगितलं...

- **- होल्ड- बाईट- सिंगल** - -

या सुधारणा म्हणजे करव्यवस्थेतलं एक धाडसी पाऊल असून यामुळे मागणीला चालना मिळेल, तसंच संबंधित प्रक्रिया सोप्या करतील, अशी प्रतिक्रिया फिक्कीचे माजी अध्यक्ष शुभ्रकांत पांडा यांनी दिली आहे. लहान व्यापारी, ग्राहकांसह भारताच्या अर्थव्यवस्थेलाही फायदा होणार असल्याचं ऑल इंडिया ट्रेडर्स कॉन्फेडरेशने म्हटलं असून त्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.

सर्वसामान्यांनी या फेरबदलांबद्दल समाधान व्यक्त केलं आहे. ऐकूया एका गृहिणीची प्रातिनिधीक प्रतिक्रीया..

- **- होल्ड- बाईट- पवार - -**

- **<><><><>**

वस्तू आणि सेवा कररचनेच्या सुसूत्रीकरणाला काल वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या ५६व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यापुढे फक्त ५ आणि १८ टक्के अशी दोन स्तरात जी एसटी कर आकारणी होईल असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं. ही सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू केली जाईल.

**वैयक्तिक विमा**, सावधी विमा, युलीप अथवा एन्डोवमेंट पॉलिसी, कौटुंबिक, ज्येष्ठ नागरिकांचा विमा तसंच पुनर्विमा यांसह सर्व वैयक्तिक आरोग्य विमा पॉलिसी यांना वस्तू आणि सेवा करातून सवलत देण्यात आली आहे. सामान्य माणसाला परवडणारा विमा

मिळणं आणि विम्याची व्याप्ती वाढवण्याचा उद्देशानं हे बदल केल्याचं सीतारामन यांनी सांगितलं. जीएसटी बदलामध्ये ३३ जीवरक्षक औषधांवरील कर १२ टक्क्यांवरून शून्य तर कर्करोग, दुर्मिळ आजार आणि इतर गंभीर आजारांवर वापरल्या जाणाऱ्या तीन जीवरक्षक औषधांवरील जीएसटी ५ टक्क्यांवरून शून्य करण्याची घोषणा केली आहे. इतर सर्व औषधांवरील कर १२ टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. तर वैद्यकीय शस्त्रक्रिया, दंतोपचार, पशुवैद्यकीय हेतूंसाठी वापरल्या जाणारी वैद्यकीय उपकरणं आणि साधनं यांच्यावरचा कर १८ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात आला आहे. **त्याशिवाय** केसांना लावायचं तेल, साबण, शॅम्पू, टूथपेस्ट, टूथब्रश, सायकल, स्वयंपाकाची भांडी, आदी घरगुती वापराच्या वस्तूवर ५ टक्के जीएसटी असेल.

**सामान्य** मध्यमवर्गाला दिलासा देणारे अन्य महत्त्वपूर्ण निर्णय देखील कालच्या बैठकीत घेण्यात आले. त्यानुसार वातानुकुलित यंत्र, दूरचित्रवाणी संच, डिशवॉशर, लहान चारचाकी, मोटारसायकल यांच्यावरचा २८ टक्के जीएसटी कमी करून तो १८ टक्के करण्यात आला. सीमेंट आणि तीनचाकी वाहनांवरील करही २८ टक्क्यावरून १८ टक्के करण्यात आला आहे. **अप्रत्यक्ष कर रचनेतील १२ टक्के आणि २८ टक्के दर रद्द करून, ५ टक्के आणि १८ टक्के करण्यात आले तसंच सध्याचे चार टप्पे कमी करून दोनवर आणण्यात आले आहेत.**

पानमसाला, तंबाखू उत्पादन, सिगारेट तसंच साखरयुक्त पेयांवर ४० टक्के विशेष जीएसटी दर आकारला जाईल. तसंच बाराशे सीसी पेट्रोल आणि पंधराशे सीसीपेक्षा अधिक क्षमतेच्या डिझेल कारवर ४० टक्के कर लावला जाईल. त्यामुळे या वस्तू महागणार आहेत.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांच्याबरोबर शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केली. यावेळी परस्पर सहकार्यांच्या विविध पर्यायांवर चर्चा झाली. दोन्ही देशातल्या समान प्राधान्यांचे विषयही चर्चेत होते. आज सकाळी परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ.एस. जयशंकर यांनी सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेंस वाँग यांच्या बरोबर चर्चा केली. दोन्ही देशाच्या प्रधानमंत्र्यांच्या चर्चेत परस्पर सहकार्याची नवी वाट निर्माण होईल असं त्यांनी म्हटलं आहे. सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग हे तीन दिवसाच्या भारत दौऱ्यावर

असून त्यांचा हा दौरा भारत सिंगापूर यांच्यातल्या संबंधाना ६० वर्ष पूर्ण होत असल्याबद्दल होत आहे.

<><><>

शेअर बाजाराच्या धर्तीवर कोळशाच्या व्यवहारासाठी वेगळा मंच सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी यांनी आज मुंबईत दिली. कोळसा मंत्रालयाच्या स्टार रेटिंग पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते.या मंचाच्या स्थापनेला संसदेची मान्यता मिळाली असल्याचं त्यांनी सांगितलं. या मंचाच्या माध्यमातून देशातल्या खरेदीदारांच्या गरजा पूर्ण केल्या जातील असं ते म्हणाले. गेल्या काही वर्षात कोळसा क्षेत्रात सातत्याने सुधारणा होत आहेत. कोळसा खाणींच्या लिलावातून खासगी क्षेत्रातल्या अधिकाधिक कंपन्या या क्षेत्रात येत आहेत. कोळसा उत्खननातील खासगी क्षेत्राची हिस्सेदारी ५० टक्के पर्यंत वाढावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. येत्या काळात कोळशाची मागणी वाढणार असल्याने कोळसा क्षेत्रातल्या कंपन्यांनी नवनवतीन तंत्रज्ञान विकसित करावे. त्याचवेळी विविध घटकांना ध्यानात घेऊन काळजीपूर्वक खाणकाम करावं असं आवाहन रेड्डी यांनी केलं. यावेळी कोळसा आणि खाणकाम क्षेत्रातल्या विविध कंपन्यांना आणि संस्थांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. कोळसा नियंत्रकांच्या नव्या वेबसाईटचे अनावरण सुद्धा त्यांनी केले.

<><><>

युक्रेनविरुद्धचं युद्ध थांबवण्याबाबत रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांचा प्रतिसाद समाधानकारक नसेल तर त्यांच्यावर नवे निर्बंध लादले जातील, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला. रशिया-युक्रेन युद्धाबाबत विचारलेल्या प्रश्नाला ते काल वार्ताहर परिषदेत उत्तर देत होते.

<><><>

बिहारमधल्या राजगीर इथं सुरु असलेल्या हॉकी आशिया कप २०२५ च्या सुपर ४ सामन्यात भारतानं कोरियाला २-२ असं बरोबरीत रोखलं. हार्दिक सिंगनं भारताला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर यांग जिहुन आणि ह्योनहोंग किम यांनी कोरियासाठी सलग दोन गोल केले. मनदीप सिंग यांनी शेवटच्या क्वार्टरमध्ये भारताला एक गुण मिळवून देत बरोबरी साधली. भारतीय हॉकी संघ साखळी सामन्यांमध्ये अपराजित राहिला आहे.

हरमनप्रीतच्या नेतृत्वाखालील संघाने चीनचा ४-३, जपानचा ३-२ आणि कझाकस्तानचा १५-० असा पराभव केला.

**<><><><>**

भारतीय हवामान विभागानं गुजरातसाठी पुढचे तीन दिवस तर मध्य प्रदेशाच्या पश्चिम भागात उद्यापर्यंत अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तसंच विदर्भ, छत्तीसगड आणि ओडिशामध्ये काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><>//**